# बृहन्मुंबई महानगरपालिका

**रा.ए.स्मा. रुग्णालय व सेठ गो.सु.वै.महाविद्यालय, परळ, मुंबई – ४०० ०१२.**

केईएम/पी/१०८/ओडी , दि. २१.०५.२०२१

रा.ए.स्मा.रुग्णालयाच्या आस्थापनेवरील 'ई.ई.जी. तंत्रज्ञ' या संवर्गातील ३ रिक्त पदे भरण्याकरीता दि. ०१.१२.२०२० रोजी दिलेल्या सार्वजनिक वर्तमानपत्रात तसेच संकेतस्थळावर जाहिरात देवून दि ०१.१२.२०२० ते १८.१२.२०२० पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले होते. उमेदवारांना अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांनुसार दि.१२.०२.२०२१ रोजी व्यवसाय चाचणी घेण्यात आली. जाहिरातीतील मंजूर अर्हतेनुसार व जाहिरातीत नमुद गुणाच्या विभागणीनुसार गुणवत्ताधारक खालील उमेदवारांची मूळ कागदपत्रांच्या पडताळणी सापेक्ष 'ई.ई.जी. तंत्रज्ञ' पदासाठी निवड यादी करण्यात येत आहे.

**प्रवर्ग : खुला (सर्वसाधारण)**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | निवड |
|---|---|---|
| १ | श्रीम. मोरे संगिता विलास | खुला (सर्वसाधारण) |

**प्रवर्ग : इतर मागासवर्ग (सर्वसाधारण)**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | निवड |
|---|---|---|
| १ | श्रीम. नितल नितीन भावसार | इ.मा.व. (सर्वसाधारण) |

**प्रवर्ग : अनुसुचित जाती (सर्वसाधारण)**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | निवड |
|---|---|---|
| १ | श्रीम. गायकवाड अक्षता विजय | अ.जा. (सर्वसाधारण) |

उपरोक्त नमुद उमेदवारांपैकी निवड झालेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी करीता आपण अर्जावर नमुद केलेल्या पत्त्यावर पत्र प्राप्त होताच हजर व्हावे.

उपरोक्त उमेदवारांची बृहन्मुंबई महानगरपालिकेतील 'ई.ई.जी. तंत्रज्ञ' पदावरील निवड खालील अटीसापेक्ष तात्पुरत्या स्वरुपाची (Provisional) आहे. तसेच सदर निवड ही कागदपत्र पडताळणी सापेक्ष असुन मूळ कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र ठरल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१. निवडीसाठी सादर केलेल्या सर्व मूळ प्रमाणपत्रांची नियुक्तीपूर्वी पडताळणी.
२. पोलिस खात्यामार्फत उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र.

३. जाहिरातीत/अर्जात नमूद केलेल्या अटी/शर्ती यांची पूर्तता करणे.

४. नियुक्तीच्या वेळी उमदेवाराजवळ संगणकामधील विहित प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहित केलेले M.S.C.I.T. ही परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा नियमानुसार सेवा समाप्त करण्यात येईल. तसे प्रतिज्ञापत्र उमेदवाराने देणे आवश्यक राहिल.

५. नियुक्त स्त्री/पुरुष उमेदवारांना सदर पदावर रुग्णालयात तिन्ही पाळीमध्ये (shift duty) काम करावे लागेल.

६. जे उमेदवार जात वैधता प्रमाणपत्र विहित वेळेत सादर करू शकणार नाहीत त्यांची सेवा शासन निर्णयानुसार त्वरीत समाप्त करण्यात येईल. तसे प्रतिज्ञापत्र उमेदवाराने देणे आवश्यक राहिल.

तसेच सादर केलेल्या संपूर्ण प्रमाणपत्रात काही त्रूटी आढळल्यास उमेदवारांचे नाव निवड यादीतून काढून टाकण्यात येईल / निवड झालेली असेल तरी उमेदवाराची नियुक्ती केव्हाही रद्द करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सही/-
**अधिष्ठाता**
रा.ए.स्मा. रुग्णालय

फ.ए.प. सं.प्र.